शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

ई-मेल : fra.govmh@gmail.com
संकेतस्थळ : www.mahafra.org
संपर्क : ०२२-३११९८०३४८ / ८८२८७ ८६२६४

जा.क्र.: शुनिप्रा/९६८/२०२६ दिनांक: १५/०९/२०२६

सूचना

विषय: शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी 'शुल्क मंजुरी' (Upward Revision) तसेच शुल्कामध्ये 'कोणतीही वाढ न करण्याबाबतचा पर्याय'(No Upward Revision) निवडून ऑनलाइन प्रस्ताव सादर करणे.

संदर्भ: प्राधिकरणाचे दि.१७/०७/२०२६,दि.०१ व ०२/०९/२०२६ आणि दि. १२/०९/२०२६ रोजीचे ठराव.

महाराष्ट्र राज्यातील सर्व विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक संस्थांना याद्वारे सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी शुल्क मंजुरीसाठी (Upward Revision) प्रस्ताव सादर करण्याची तसेच शुल्कामध्ये 'कोणतीही वाढ न करण्याचा पर्याय' (No Upward Revision) निवडल्याची नोंद करण्यासाठीची ऑनलाइन लिंक **दिनांक १५ सप्टेंबर २०२६** पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर लिंक **दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत खुली राहील**. सदर मुदत महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६ मधील कलम १४(१)(ख) मधील तरतुद करण्यात आली आहे.यामुळे प्राधिकरणास प्राप्त प्रस्तावांवर तातडीने निर्णय घेणे सुलभ होईल.

संस्थांना निर्देश देण्यात येतात की शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी, लेखापरीक्षित आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या आधारे, ऑनलाइन प्रस्ताव सादर करावे . यासाठी संस्थांना शुल्क नियामक प्राधिकरणाकडून संबंधित संस्थांना प्रदान करण्यात आलेल्या आणि यापूर्वी नोंदणीकृत असलेल्या युजर आयडी (user-id) व पासवर्डचा (password) वापर करून पोर्टलवर प्रवेश करावा.

आधीच नोंदणीकृत असलेल्या संस्थांसाठी ऑनलाइन शुल्क प्रस्ताव सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे आहे:

Go to www.mahafra.org -> click on the menu **Online Fees Proposal Application -> Click on "Submission of Online Fee Approval Proposal Academic Year 2027-2028.**"

शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
सत्यमेव जयते
महाराष्ट्र राज्य

जे संस्थांनी अद्याप शुल्क नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत नाहीत तसेच नवीन संस्था यांनी सर्वप्रथम शुल्क नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी करून User ID आणि Password प्राप्त करणे आवश्यक आहे. User ID आणि Password प्राप्त केल्यानंतरच त्यांना पोर्टलवर उपलब्ध करून दिलेल्या लिंकद्वारे ऑनलाइन प्रस्ताव सादर करता येईल. नोंदणी पूर्ण करून User ID आणि Password प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थांनी शुल्क मंजुरीसाठी ऑनलाइन प्रस्ताव सादर करण्यास पात्र ठरतील.

नवीन संस्थांनी किंवा शुल्क नियमन प्राधिकरणाकडे यापूर्वी नोंदणीकृत नसलेली संस्थांनी खालीलप्रमाणे नोंदणी करून प्रस्ताव सादर करू शकतात:-

Go to www.mahafra.org -> click on the menu **Online Fees Proposal Application -> Click on "New College Registration" and then fill up the registration form by filling in the required information.** नोंदणी केल्यानंतर संबंधित संस्थेला युजर-आयडी (User ID) आणि पासवर्ड (Password) प्रदान करण्यात येईल. सदर युजर-आयडी व पासवर्डचा वापर करून पोर्टलवर प्रवेश घेऊन ऑनलाइन शुल्क प्रस्ताव सादर करावयाचा आहे.

सर्व संस्थांनी याची नोंद घ्यावी की, प्रक्रिया शुल्क (Processing Fee) केवळ ऑनलाइन पेमेंट गेटवेद्वारेच स्वीकारले जाईल. धनादेश (Cheque) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) स्वीकारले जाणार नाहीत. प्रक्रिया शुल्क भरलेले नसलेला कोणताही प्रस्ताव स्वीकारला जाणार नाही किंवा त्यावर प्रक्रिया केली जाणार नाही.

शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी शुल्क निश्चित करण्याबाबत प्राधिकरणाने निर्धारित केलेले निकष (norms) सर्व महाविद्यालयांनी काळजीपूर्वक अभ्यास करून, त्यानंतरच ऑनलाइन प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया सुरू करावी.

निर्धारित केलेल्या कालावधीत कोणत्याही संस्थेने प्रस्ताव सादर न केल्यास, संस्थेची अशी कृती ही सदर अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन मानली जाईल आणि अधिनियमाच्या कलम २० अंतर्गत तरतूद केल्याप्रमाणे दंडात्मक कारवाईस संस्था पात्र ठरेल.

टीप: *प्रस्तावासोबत आवश्यक असलेली सर्व आवश्यक कागदपत्रे निर्धारित प्रणालीद्वारे ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे.* ***छापील प्रत (hard copy) सादर करणे आवश्यक नाही.*** *तथापि, प्राधिकरणास प्रस्तावाची किंवा आवश्यक कागदपत्रांची छापील प्रत (hard copy) आवश्यक वाटल्यास, प्राधिकरण संस्थेला सदर प्रती विहित मुदतीत सादर करण्याचे निर्देश देऊ शकते.*

आदेशानुसार

अवर सचिव,
शुल्क नियामक प्राधिकरण,
मुंबई